## योजना

**योजनेचे नाव** :- 13 वने 7% वन महसुल अनुदान योजना सन 2024-2025 अंतर्गत खरीप हंगामाकरीता 50% अनुदानावर तृणधान्य बियाण्यावरअनुदान देणे.

**तरतुद** :- रुपये 15,00,000/- (अक्षरी रुपये पंधरा लक्ष)

जिल्हयातील मुख्य पिक भाताचे असुन या पिकाचे क्षेत्र वाढविणे हा या विभागाचा मानस आहे. जिल्हयातील शेतक-यांना दर्जेदार व प्रमाणित बियाणे कमी दरात उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेच्या उददेशपुर्ती करीता सन 2024-2025 मध्ये पंचायत समिती मार्फत विक्री होणा-या प्रमाणित व सत्यदर्शक तृणधान्य बियाण्यावर शेतक-यांना 13 वने 7% अनुदान योजनेअंतर्गत 50% सुट देण्यात येत आहे.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षात महाबिज मार्फत पंचायत समितीस बियाणे पुरवठा करण्यात येईल पुरवठा करण्यात येईल. पुरवठा झालेले बियाणे विक्री करताना सुटीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम शेतक-याकडुन रोखीने घेण्यात यावी. सदर खर्च हा सन 2024-2025 या वित्तीय वर्षात 13 वने 7% वन महसुल अनुदान योजने अंतर्गत तृणधान्य बियाणेवर अनुदान देणे या लेखाशिर्षकातुन भागविण्यात येईल. पंचायत समिती मार्फत वाटप बियाणे दर वर्षी प्रमाणे कार्यवाही करुन लेखा परिक्षणासाठी आवश्यक दस्त ऐवज जतन करुन ठेवतील. पंचायत समिती मार्फत विक्री झालेल्या बियाणे चा **अंतीम अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र** कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे सादर करतील.

**योजनेच्या अटी व शर्ती.**

1) महाबीज /कृषि विद्यापिठ/ रा.बी.नि.मार्फतीने पुरवठा होणा-या तृणधान्य बियाण्यावर अनुदान देय राहील.

2) वरील योजनेचा लाभ अल्प, अत्यल्प, भुधारक अनुसुचीत जाती / जमाती विमुक्त व भटक्या जाती जमाती तसेच दारिद्रय रेषे खालील शेतक-यांना आवश्यक दस्तऐवज प्राप्त करुन देण्यात येईल.

3) भात बियाणेवर संकरीत वाण, बारीक व जाड वाण तसेच मका, ज्वारी व सुधारीत गहु वाणासाठी महाबिज कृषि विद्यापिठ राष्ट्रीय बिज निगम यांचे दरपत्रकाच्या 50% नुसार प्रति क्विंटल या प्रमाणे अनुदान देय राहील.

4) एका शेतक-यास जास्तीत जास्त 2 हेक्टर करीता लागणारा तृणधान्य बियाण्यावर अनुदान देय राहील.

5) **प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य** या तत्वावर साठा पुस्तकामध्ये नोंद घेवुन **नमुना** 7/12 वर शेतक-यांस बियाणे अनुदानीत दराने वितरीत करावे. याची संपुर्ण जबाबदारी कृषि अधिकारी ,विस्तार अधिकारी (कृषि) यांची राहील.

6) पुरवठा संस्थेकडुन पुरवठा झाल्यानंतर देयके प्राप्त करुन घ्यावे व लाभार्थी सहभाग बियाणे वितरणापुर्वी वसुल करुन पुंर्ण रक्कमेचा धनादेश **महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ चंद्रपूर** यांना पुरवावा व तसे कार्यालयास अवगत करावे व वितरण अहवाल या कार्यालयास सादर करावा.

7) अनु.क्र.2 मध्ये नमुद केलेल्या अटी मध्ये जे शेतकरी येत नसतील त्यांना पुर्ण किंमतीवर बियाणे वाटप करावे व याचा हिशोब वेगळा ठेवावा.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली